# प्रकरण - ६

# प्रकरण सहावे

# उपसंहार

**प्रस्तावना**

'सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील ग्रामीण नेतृत्वाचा एक अभ्यास' हा शोधप्रबंध लिहित असताना सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्रातील शिक्षण, सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली आहे हे संशोधनाअंती दिसून आले. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रात व लोकशाही जिथे प्रस्थापित करण्यात आली आहे तेथे लोकशाही व्यवस्था त्या राष्ट्रातील नेत्यांच्या संमोहित व्यक्तिमत्त्वामुळेच टिकाव धरुन आहे. पूर्वीचे राजकीय पुढारी समाजातील विशिष्ट स्तरातून निर्माण होत. आज परिस्थिती बदललेली आहे. नेतृत्व व व्यक्ती ह्यात फरक करण्यात येतो. राज्याची शक्ती संविधान आणि विधी यानुसार संघटीत झालेली आहे. सत्ता ही पदाला प्राप्त झालेली असते. व्यक्तीला नाही अशा या पदाच्या सत्तेचे क्षेत्र व मर्यादा निर्धारित केलेल्या असतात. व्यक्तीची स्वच्छंदपूर्ण सत्ता आज चालू शकत नाही. नेतृत्वातील बदल नियमानुसार होत असतो. नेमणुका तसेच निवडणुका हे या बदलाचे दोन मार्ग आहेत. बळामुळे सत्ता हस्तगत केली जात नाही. पदाच्या सीमा एकप्रकारे मर्यादित झालेल्या असतात. व्यक्तिमत्वाचे स्वरूप या गुणावर आधारित पूर्वीची नेतृत्वाची कल्पना आज अमान्य झालेली आहे. कार्याच्या संदर्भात कार्यभाग पार पाडण्याची क्षमता हे नेतृत्वाचे प्रमुख लक्षण समजले जाते. तसेच नेतृत्वाचे परिस्थितीजन्य स्वरूपही आज मान्य केले जाते. नेत्याची निवड याच आधारावर केली जाते. नेते हे जन्मजात निर्माण होत नाहीत ते तयार होत असतात. अधिमान्यता हा या नेतृत्वाचा आधार असतो. वेळोवेळी होणाऱ्या निवडणुकानुसार नेतृत्वात बदल पण होऊ शकतो. निरनिराळ्या राजकीय पक्षांना अशा राजकीय व्यवस्थेत वाव असल्यामुळे विशिष्ट अशा राजकीय पक्षातील लोकांची नेतृत्वासंबंधी मक्तेदारी निर्माण होत नाही. लोकांचा विश्वास व नेत्यांचे कार्य ह्या आधारावर लोकशाहीप्रणित नेतृत्व निर्माण होते. राजकीय नेतृत्वात वेळोवेळी बदल होत असलेला

आपणास पहावयास मिळतो. राजकीय व्यवस्थेच्या तळाशी असलेले नेतृत्व लोकशाहीच्या मार्गाने त्या व्यवस्थेच्या शिखरापर्यंत सहज पोहचू शकते.

अशाप्रकारे वरील सिद्धांतीक मांडणीचा विचार करता सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे राजकीय नेतृत्वाचा विचार केला असता अतिशय संघर्षमय परिस्थितीतून संघर्ष करत राजकीय व्यवस्थेच्या तळाशी असलेले राजकोय नेतृत्व स्वतःच्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय व्यवस्थेच्या शिखरापर्यंत पोहोचले असल्याचे संशोधनाअंती दिसून येते. कोणत्याही एका मर्यादित क्षेत्रापुरतेच किंवा स्वतःच्या मतदारसंघापुरतेच मर्यादित कार्य न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रात विविध क्षेत्रात विविधांगी कार्य करणारे नेतृत्व म्हणजे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्व होय. सहकारमहर्षिचा जन्म गरीब शेतकरी कुटुंबात झाला. कोणत्याही व्यक्तीला लाभलेली परिस्थिती त्या व्यक्तीची गुरु असते. रखरखतं ऊन डोक्यावर घेवून पायाला चटके सोसत सावलीचा आधार शोधत मैलामैलाचं अंतर पायी जाऊन शिक्षण घेणे व संस्था स्थापन करण्यासाठी फिरणे हे त्यांच्या वाट्याला आले. सहकारमहर्षिचा जिल्हा दुष्काळी म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहे. आभाळाकडे बघणाऱ्या भकास नजरा त्यांनी सभोवताली पाहिल्या. अज्ञानाचे व दारिद्र्याचे भयाण रुप शंकररावजींनी पाहिले. स्वतःला शाळेतील फी भरण्यास मिळाली नाही ही गोष्ट सतत त्यांना जाणवत होती. शाळेपेक्षा गुरांच्या मागे जात असलेले मित्र पाहिले. या सर्व परिस्थितीचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. ही सर्व परिस्थिती बदलली पाहिजे यासाठी मनात जिद्द ठेवली. त्यांच्या आईचे यामागे अतिशय कष्ट आहे. त्यांच्यावर आजी व आईवडिलांकडून अतिशय चांगले संस्कार झालेले दिसून येतात.

शेतकऱ्यांविषयी असणारी निष्ठा त्यांच्या कार्यातून दिसून येते. शेतकऱ्यांना जर त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नसेल तर ते शेतकऱ्यांना संघटित करीत व योग्य भाव मिळण्यासाठी भांडत असत. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे या उद्देशाने १९४८ साली प्रथम विजय विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली व नंतर शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केलेली दिसून येते. कारण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. त्यामुळे त्यांनी सर्वप्रथम शेतकऱ्यांच्या मुलांना वसतिगृहाची सोय केली

पाहिजे म्हणून वसतिगृह स्थापन केले व नंतर शिक्षणसंस्था स्थापन केली. आधुनिक काळात यशस्वी नेतृत्वाबाबत जी अनेक संशोधने झाली आहेत त्यांचे काही निष्कर्ष नियमरुपाने सांगता येणे शक्य आहे. समुहाला असे वाटले पाहिजे की नेता हा आपल्यापैकीच एक आहे बाहेरचा नाही. त्यासाठी नेत्याची मूल्ये व अभिवृत्ती आणि समुहाची मूल्ये व अभिवृत्ती यामध्ये फार तफावत नसावी व असल्यास नेतृत्वास ओहोटी लागते. म्हणूनच यशस्वी नेते समुहात मिसळतात व त्यांच्या जीवनात सहभागी होत असल्याचे दाखवित असतात. पण त्याबरोबरच अनुयायांना असेही वाटले पाहिजे की आपल्याला इष्ट वाटणारे गुण नेतृत्व करणाऱ्याच्या ठिकाणी अधिक प्रमाणात आहेत. उत्तम पण बुद्धी, ज्ञान, कर्तबगारी इत्यादी बाबतीत आपल्यापैकी उत्तम व्यक्ती असे नेत्याविषयी अनुयायांना वाटले पाहिजे. महाराष्ट्राच्या स्थानिक नेतृत्वाचा विचार केला असता महाराष्ट्र स्थापनेच्या अगोदर जी नेतृत्व तयार झाली ती नेतृत्व भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून तयार झाल्याचे दिसते. याचे उदाहरण म्हणून अनेक नेतृत्वाचा उल्लेख करता येईल. उदाहरणार्थ यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, नागनाथआण्णा नायकवडी, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, शंकरराव मोहिते-पाटील, क्रांतीअग्रणी जी. डी. (बापू) लाड, किसनवीर, तुळशीदास जाधव, यशवंतराव मोहिते, राजारामबापू पाटील, भाई एन. डी. पाटील, भाई गणपतराव देशमुख, बाळासाहेब देसाई इत्यादी अनेक नेतृत्व तत्कालीन कालखंडात विविध चळवळीतून उदयाला आली तर महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात ग्रामीण नेतृत्व तीन प्रकारातून उदयाला आल्याचे संशोधनाअंती दिसून येते.

१. महाराष्ट्र ही सहकार क्षेत्राची पंढरी म्हणून ओळखली जाते. सहकारातून वर आलेले नेतृत्व म्हणून अनेक उदाहरणे सांगता येतील. उदाहरणार्थ बाळकृष्ण विखे-पाटील, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, शंकरराव मोहिते-पाटील, पी. डी. पाटील, लक्ष्मणराव पाटील, जयंत पाटील, विनय कोरे इत्यादी अशी अनेक नेतृत्व महाराष्ट्रात सहकारातून राजकारणात आली असल्याची उदाहरणे आहेत.

२. १९६२ साली महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था सुरु झाली. यातून महाराष्ट्रात इतर क्षेत्राच्या तुलनेने सर्वात जास्त ग्रामीण नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात पुढे आली. याचे उदाहरण म्हणून पुढील नेतृत्वाचा उल्लेख करावा लागेल. उदाहरणार्थ विलासराव देशमुख, विजयसिंहजी मोहिते-पाटील, आर. आर. पाटील, सदाशिवराव मंडलिक, रामराजे नाईक-निंबाळकर, शिवाजीराव नाईक,राजन पाटील इत्यादी अनेक नेतृत्व पंचायत राज व्यवस्थेतून राजकारणात आली.

३. स्वत:च्या कर्तृत्वाने व लोकोपयोगी केलेल्या कार्यातून लोकांच्या अधिमान्यता मिळवून आधुनिक महाराष्ट्रात काही राजकीय नेतृत्व तयार झाली. याचे उदाहरण म्हणून पुढील नेतृत्वाचा उल्लेख करावा लागेल. उदाहरणार्थ शरदचंद्रजी पवार, सुशिलकुमार शिंदे, डॉ. पतंगरावजी कदम, डॉ. पद्मसिंह पाटील, अभयसिंहराजे भोसले, दिग्विजय खानविलकर, नारायण राणे, गोपीनाथ मुंडे, लक्ष्मणराव ढोबळे, रणजितसिंह मोहिते-पाटील इत्यादी अशी अनेक नेतृत्व विविध कार्यातून निवडून येऊन आमदार झाली. आपल्या कार्याचा ठसा त्यांनी जनतेवर उमटविला आहे.

सोलापूर जिल्हयातील माळशिरस मतदारसंघात अत्यंत संघर्षमय परिस्थितीतून विविध कार्यातून कर्तृत्वाचा डोंगर उभा करणारे राजकीय नेतृत्व म्हणजे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील होय. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना सोलापूर जिल्हयात व कॉँग्रेस पक्षात आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर राजकीय नेतृत्व प्रस्थापित केले. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या सहकारी नेतृत्वाबाबत विचार केला असता त्यांनी माळशिरस तालुक्याबरोबरच सोलापूर जिल्हयात सहकाराचे जाळे विणले आहे. सहकाराविषयी शासनाचे धोरण सर्वत्र सारखेच होते. परंतु महाराष्ट्रात सहकार चळवळ भक्कम झाली त्याचे कारण म्हणजे सहकार चळवळीला लाभलेले खंबीर व गतीमान नेतृत्व होय. ही चळवळ महाराष्ट्रात यशस्वी करण्यास नामदार गोखले, वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, श्री. विठ्ठलराव विखे-पाटील, बाळासाहेब देसाई, तात्यासाहेब कोरे, यशवंतराव मोहिते इत्यादी अनेक मातब्बर आणि कार्यक्षम व्यक्तिंच्या नेतृत्वाने आणि

मार्गदर्शनामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ यशस्वी झाली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा जो कायापालट झाला त्या विकासामध्ये सहकारी क्षेत्राचा मोठा वाटा आहे. सहकाराने ग्रामीण भागातील लोकांचे अठराविश्व दारिद्र्य नष्ट करुन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावले. याच विचाराने प्रेरित होऊन सहकारमहर्षिंनी माळशिरस तालुक्यात व सोलापूर जिल्हयात सहकाराचे क्षेत्र विकसित केले आहे. माळशिरस हा सहकारमहर्षिंचा मतदारसंघ अतिशय दुष्काळी होता. तेथील जनतेचा शेती हा मुख्य व्यवसाय. तीही कोरडवाहू. पाऊस पडला तर शेती पिकते अन्यथा प्रचंड दुष्काळ. परंतु शंकररावजींच्या कार्यक्षम व कर्तृत्ववान नेतृत्वाने विविध विकास कामातून व सहकाराच्या माध्यमातून तेथे नंदनवन फुलवले आहे.

सर्वसामान्य माणसाला, शेतमजुराला सावकारी पाशातून मुक्त करता यावे म्हणून सहकारी बँकेची स्थापना केली व घरोघरी जर्सी गाईपासून कशाप्रकारे फायदा मिळेल याचे प्रात्यक्षिक सहकारमहर्षिंनी करुन दाखविले. अगोदर स्वतः जर्सी गाई विकत घेतल्या व त्या गायींपासून भरपूर फायदा होतो हे लक्षात आल्यानंतर इतर लोकांना घेण्यास प्रवृत्त केले. सर्वसामान्य लोकांना यापासून भरपूर फायदा झालेला दिसून येतो. सहकारमहर्षिंचे ध्येयच असे होते की, "जीवात जीवमान असेपर्यंत जनसेवाच करीन". या ध्येयाप्रमाणे ते सतत वागत असत. गरीब-श्रीमंत, जवळचा-परका असा भेदभाव ते कधीही करत नसत. सर्वांना समान न्याय हे त्यांचे जीवनाचे सूत्र होते. त्यांनी लोकांच्या हिताची अनेक लोककल्याणकारी कामे केलेली दिसून येतात. त्यामुळेच १९५२ पासून अपवाद वगळता ते सतत आमदार झाले व त्यांच्या पश्चातही त्यांचे चिरंजीव विजयसिंहजी मोहिते-पाटील आमदार व मंत्री आहेत. त्याचप्रमाणे दुसरे चिरंजीव प्रतापसिंहजी मोहिते-पाटील हेही आमदार आहेत. तसेच सोलापूर लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणूनही निवडून आले होते. तसेच त्यांचे कर्तृत्ववान नातू व विजयदादांचे चिरंजीव रणजितसिंहजी मोहिते-पाटील हेही सध्या आमदार आहेत. अशाप्रकारे राजकीय पदे त्यांच्या घरात सतत राहिलेली आपणास दिसून येतात. यामागे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे भरीव सामाजिक व राजकीय कार्य हेच असल्याचे संशोधनाअंती दिसून येते.

तसेच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड क्रांतीच केली आहे. कारण स्वतःला गरीबीमुळे जास्त शिकता आले नाही याची त्यांना सतत जाणीव होत होती. आपल्याला जी वेळ आली ती इतरांना येऊ नये म्हणून पहिलीपासून ते पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय शंकररावजींनी ग्रामीण भागामध्ये केलेली दिसून येते. शिक्षक स्टाफ अतिशय कष्टाळू व प्रामाणिक आहे. संस्थेत गुणवत्तेवरतीच निवड होत असते. आदर्श काम करणाऱ्या शिक्षकाला व शाळेला पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. दरवेळेस बोर्ड व विद्यापीठाच्या परिक्षेत संस्थेचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत येतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना हे एक आदर्श शैक्षणिक संकुल निर्माण झाले आहे.

गोरगरीब, अपंग, मागासवर्गीय व्यक्तींना व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना सहकारमहर्षिंनी १९७८ साली स्थापन केलेल्या 'जनसेवा संघटने'मार्फत भरीव स्वरूपाची मदत केली जाते. या संघटनेमार्फत वृक्षारोपण, मोफत प्लाटिक सर्जरी, रक्तदान, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी कार्यक्रम घेतले जातात. सतत विधायक स्वरूपाचे कार्य संघटना हाती घेत असते. संपूर्ण जिल्हयातील शेतकऱ्यांना शेतीसाठी वेळोवेळी कर्ज उपलब्ध व्हावीत म्हणून सहकारी तत्त्वावर विविध बँका व पतसंस्था स्थापन केल्या आहेत. या सर्व सहकारी संस्थांचे वैशिष्ट्य म्हणजे दुष्काळी भागात संस्था स्थापन करुन सर्व संस्था नफा तत्त्वावर चालवून संपूर्ण महाराष्ट्रभर आदर्श निर्माण करुन दिला आहे. अलीकडील काही पुढाऱ्यांनी जनतेच्या पैशातून सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. त्या पुढाऱ्यांना चरण्यासाठी कुरण म्हणून त्याचा वापर होऊ लागला आहे.

अशाप्रकारे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी शिक्षण, सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात, मतदारसंघात व संपूर्ण सोलापूर जिल्हयात केलेले कार्य त्यातून हजारो अकुशल व सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली. या सर्व व्यवस्थेतून सहकारमहर्षिंचे नेतृत्व तयार झाल्याचे संशोधनाअंती दिसून येते. एका गरीब कुटुंबात जन्म घेवून शून्यातून विश्व निर्माण केले आहे. हे असंख्य होतकरु तरुणांच्यादृष्टीने आदर्श व अनुकरणीय आहे. त्यांनी केलेले कार्य दीपस्तंभासारखे आहे. म्हणून त्यांचे कार्य सोलापूर जिल्हयापुरते मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रभर कार्य केले आहे. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्यासारखे कर्तबगार नेतृत्व देशातील

प्रत्येक विधानसभा व लोकसभा मतदारसंघात निर्माण झाले तर महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु यांना अभिप्रेत असणारा भारत देश निर्माण होण्यास अवधी लागणार नाही.

**सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचा जीवनपट**

| सन | घटना |
|---|---|
| दि. १४-१-१९१८ | जन्म मकर संक्रांत दिनी. |
| १९३६ | सामाजिक कार्यास प्रारंभ. |
| १९३९ | कै. लक्ष्मीबाई मोहिते यांनी दत्तक घेतले. |
| १९४० | सहकार्याची ज्योत पेटविली. |
| १९४२ | पत्री सरकार गटांत सामील झाले. |
| १९४३ | अकलूज येथील पाटीलकीची सूत्रे हाती घेतली. सुपरवायझिंग युनियन प्रेसिडेंड म्हणून निवड झाली. |
| १९४४ | अकलूज वि. का. स. सोसायटीचे सभासद झाले. तद्नंतर विवाहबद्ध (सौ. रत्नप्रभादेवी) मौजे मांजर्डे, जि. सांगली. |
| १९४५ | अकलूज ग्रामपंचायतीचे सरपंचपदी निवड झाली. |
| १९४६ | शिक्षण प्रसारक कार्यास प्रारंभ केला. |
| १९४७ | मा. तुळशीदासजी जाधव यांचे अध्यक्षतेखाली सत्कार. |
| १९४८ | विजय विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली. |
| १९४९ | कै. लक्ष्मीबाई मोहिते यांचे देहावसान. |
| १९५१ | कृषि उत्पन्न बाजार समितीची स्थापना. |
| १९५२ | स्वतंत्र पक्षाचे उमेदवार म्हणून आमदारपदी निवड झाली. |
| १९५४ | भूसार पिके, खरेदी विक्री मार्केट कायदा करुन घेतला व विजय विद्यार्थी वसतिगृहाचा इमारतीत प्रवेश केला. |
| १९५५ | सहकारी तत्त्वावर साखर कारखान्याची सुरुवात करुन पहिली सभा घेतली. |
| १९५७ | शेतकरी कामगार पक्षाचे आमदारपदी बहुमताने निवड. |

| | |
|---|---|
| १९५९ | धाकटे बंधू सदाशिवराव माने यांचे निधन झाले. खरेदी विक्री संघाची प्रत्यक्ष सुरुवात केली. |
| १९६० | महाराष्ट्र सरकारचे ऊस क्षेत्रातील पहिले बक्षिस मिळाले व साखर कारखान्याचे मशिनरीचा करार केला. |
| १९६१ | साखर कारखान्याचे भूमिपूजन केले. |
| १९६२ | काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून आमदारपदी निवड. |
| १९६३ | भूविकास बँकेचे चेअरमनपदी निवड झाली. तसेच यशवंत सहकारी साखर कारखान्याचा पहिला बॉयलर प्रदिपन समारंभ साजरा केला. |
| १९६४ | माचणूर, ता. मंगळवेढा प्रचंड सभेत जाहीर भाषण केले. त्याचप्रमाणे ऊस वाहतूक ट्रक/ट्रॅक्टर संघाची स्थापना केली. |
| १९६५ | टेक्निकल हायस्कूलची स्थापना, तसेच सोलापूर डी. सी. सी. बँकेचे चेअरमनपदी निवड झाली. त्याचप्रमाणे राजहंस कुक्कुटपालन संघाचे रजिस्ट्रेशन मिळविले. |
| १९६७ | अकलूज कॉलेजचा व कृष्णानंद विद्यामंदीर शुभारंभ केला. |
| १९६८ | कोयना निधीस रुपये २,११,०००.०० दिले. ज्येष्ठ बंधू कर्मवीर मारुतराव माने यांचे देहावसान, शंकर स. सा. कारखान्याची निर्मिती. ५१ वा वाढदिवस एक अपूर्व सोहळा झाला तर बेरडवाडी लिफ्ट इरिगेशनची स्थापना. |
| १९६९ | टेक्निकल हायस्कूलला शासकीय मान्यता मिळविलो. त्याचप्रमाणे विजय प्रिंटींग प्रेसची सुरुवात केली. |
| १९७० | एक्स्पो. जपान दौरा सपत्निक केला. तसेच विश्व हिंदू धर्म परिषद पंढरपुरी जाहीर भाषण केले. यशवंतनगर येथे राज्य पातळीवर कृषि औद्योगिक प्रदर्शन भरविले. तद्नंतर त्रिमूर्ती डिस्टीलरीस मंजूरी मिळविली. |
| १० मे १९७१ | ५३ वा वाढदिवस अविस्मरणीय सोहळा व ज्येष्ठ चिरंजीव विजयसिंह मोहिते-पाटील शुभविवाह एक शुभ सोहळा पार पडला. तसेच यशवंत स. सा. कारखाना अद्यावत पद्धतीने कार्यालय व उदय सभागृहाचे शानदार उद्घाटन केले. |
| १९७२ | शंकरनगर येथील पोस्ट ऑफीसचे उद्घाटन व शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टची स्थापना केली. |
| १९७३ | जननी कृष्णाबाई यांचे देहावसान झाले तर दुष्काळ पिडीतांना टँकरमार्फत पाणी पुरवठा केला. |

| | |
|---|---|
| १९७४ | त्रिसंवत्सर राज्याभिषेक प्रतिकृतीचा भव्य सोहळा. |
| १९७५ | महाराष्ट्र राज्य स. सा. कारखाना संघाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. तसेच डी. एस. टी. ए. पुणे प्रेसिडेंट म्हणून तर डी. एस. आय. पुणे चेअरमनपदी निवड झाली. बरेच दिवसांचे स्वप्नपूर्तीसाठी ग्रीन फिंगर (पब्लिक स्कूल) ची स्थापना केली. |
| १९७६ | महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे २१ वे अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून बहुमताने निवड झाली. त्याचप्रमाणे तमाशा मंडळाचे (महाराष्ट्र शाखेचे) अध्यक्ष झाले. |
| १९७७ | महाराष्ट्र काँग्रेसचे खजिनदार म्हणून निवड झाली. तसेच यशवंत सह. साखर कारखान्याचे चेअरमनपदी फेरनिवड. |
| १९७८ | ६० व्या वर्षात पदार्पण - एक अपूर्व सोहळा पार पडला. |
| ३.१.१९७९ | बॉंबे हॉस्पिटल येथे पान्थरीवर यशस्वी शस्त्रक्रिया झाली. |
| ३०.१.१९७९ | हाडाचा शेतकरी म्हणून मेळाव्यात सोलापूर येथे जाहीर भाषण केले. |
| ११.२.१९७९ | मृत्यूशी झगडा देत असता सकाळी ६.३० वाजता दिवंगत झाले. निरा नदीकाठी उगम पावलेली सहकाराची नदी मुंबईच्या महासागरात ब्रह्मार्पण झाली. |